**नियमित दिवाणी दावा क्र. १२७/२०१५**

(रुक्मीणीबाई वगैरे वि. अंबादास)

**CNR No.MHSO07-000147-2015**

## निशाणी क्र.४४ खालील आदेश

अर्जदारांनी सदरचा अर्ज वादी क्र.१ यांचे वारस म्हणून त्यांना रेकार्डवर घेण्यासाठी दाखल केला आहे. अर्जदारांचे असे कथन आहे की, वादी क्र.१ हया दिनांक १८/०७/२०२२ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांचे वारस म्हणून अर्जदारांना सदरचा दावा चालविण्याचा कायदेशीर अधिकार आहे. त्यामुळे वादी क्र.१ चे वारस म्हणून अर्जदार यांना रेकार्डवर घ्यावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जाला म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

३. दाव्याचे योग्य ते निराकरण करण्यासाठी व प्रकरण गुणदोषावर चालविण्यासाठी वादी क्र.१ चे वारस या नात्याने अर्जदार हे रेकार्डवर असणे गरजेचे आहे. त्यामुळे वादी क्र.१ चे वारस रेकार्डवर घेणे उचित ठरते. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१. अर्ज रक्कम रुपये २००/– खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदारांनी खर्चाची रक्कम प्रतिवादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी.

३. अर्जदारांनी वरीलप्रमाणे खर्चाची पूर्तता केल्यानंतर वादीने वादी क्र.१ च्या वारसांची नोंद करणेबाबत दाव्यात योग्य ती दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

४. वादीने दुरुस्त दाव्याची प्रत दाखल केल्यानंतर प्रतिवादींना जादा कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

(पी. एन. पठाडे)

दिनांकः– ०१.०३.२०२४ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पंढरपूर

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 4th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 01.03.2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 01.03.2024 |
| Judgment/Order uploaded on | - | 02.03.2024 |